॥ ॐ ॥

॥ श्रीमत्परब्रह्मपरमात्मनेनमः ॥



शिक्षापत्री

(श्री सत्‌पंथाची शिकवण)



-० मराठी अनुवाद ०-

आचार्य संतश्री जगन्नाथ महाराज

सत्‌पंथ साहित्य प्रकाशन
श्री सत्‌पंथ मंदीर संस्थान, फैजपूर

मूल्य १२ रु.

॥ ॐ ॥

॥ श्रीमत्परब्रह्मपरमात्मनेनमः ॥



शिक्षापत्री

(श्री सत्पंथाची शिकवण)



-० मराठी अनुवाद ०-

आचार्य संतश्री जगन्नाथ महाराज

सतपंथ साहित्य प्रकाशन

श्री सतपंथ मंदीर संस्थान, फैजपूर

मूल्य १२ रु.



॥ श्री निष्कलंकी नारायण भगवान ॥

॥ ॐ ॥

॥ श्रीमत्परब्रह्मपरमात्मने नमः ॥

शि क्षा प त्री

शिखामण
श्री सत्पंथाची शिकवण

: प्रकाशक :

आचार्य श्री जनार्दन गुरु जगन्नाथ महाराज

आचार्य श्री पूर्णानंद गुरु जगन्नाथ महाराज

श्री सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर

ता. यावल, जि. जळगांव, (फोन नं. ०२५८५-२४५४१७)

जो धर्माचे रक्षण करतो, त्याचे रक्षण धर्मच करतो, धर्माचे रक्षण करणारा कदापि नाश पावत नाही. ज्याच्या रक्ताच्या थेंबाथेंबात धर्माची तत्वे भिनलेली असतात तेच धर्माचे व धर्म संस्थांचे रक्षण करु शकतात.

तृतीय आवृत्ती

प्रकाशन गुरुवार दि.१४-१२-२००६

मुद्रक : कांचन ऑफसेट, फैजपूर ता. यावल, जि. जळगांव (फोन २४५६४९)

प्रकाशकाचे मनोगत ...

'शिक्षापत्री' या पुस्तकाची तृतीय आवृत्ती आपल्या हाती देताना खुप आनंद होत आहे. ह्या शिक्षापत्रीचे सत्पंथात खूप महत्त्व आहे. जीवनात आचारसंहिता असेल तरच जीवन सुखमय बनू शकते. शिक्षापत्री म्हणजे सद्गुरुंनी ओढलेली लक्ष्मण रेषाच. ह्या लक्ष्मण रेषेच्या बाहेर पाय टाकल्यावरच रावण हरण करु शकतो अन्यथा नाही. शंभर नियमांचे हे जानवे प्रत्येकाने परिधान केलेच पाहीजे. जसे एखाद्या सौभाग्यवती स्त्रिला मंगळसूत्राचे महत्त्व असते तसे प्रत्येक सद्भक्ताला या नियमरुपी मंगळसूत्राचे महत्त्व असते. सद्गुरुंनी अगदी साध्या, सोप्या सरळ भाषेत हे नियम सांगितलेले आहेत. एखादी आई जशी आपल्या मुलाला प्रेमाने समजूत घालते, त्याप्रमाणे सद्गुरुंनी समजावून सांगीतले आहे. कारण ह्या नियमांचा फायदा गुरुंना नाही तर आपल्याला आहे. सद्गुरुंनी एका नियमात सांगितले आहे की 'पाणी गाळून प्या' आता, आपण पाणी गाळून प्यायलो तर फायदा आपलाच आहे, आणि तसे नाही केले तर त्रास आपल्यालाच आहे सद्गुरुंना नाही.

अे सत्पंथ छे खड्गनी धार । धार उपर चालसे तो मुनिवर हमार ॥

या नियमांचे पालन करीत असताना त्रास तर होईलच पण फायदा त्याहीपेक्षा जास्त होईल. या नियमांप्रमाणे वागणारांच माझा परमशिष्य म्हटला जाईल, असे सद्गुरुंनी निक्षुन सांगीतले आहे. या नियमांचे दररोज वाचन करुन मनन करणे फार गरजेचे आहे.

हा नियमांचा अनमोल ठेवा प्रकाशित करण्यासाठी रोझोदे येथील श्री. प्रेमराज विष्णू महाजन, श्री. शरद प्रेमराज महाजन (ह.मु. डोंबिवली) व कुटुंबीयांनी आर्थिक सहाय्य करुन आम्हास उपकृत केले त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. तसेच फैजपूर येथील कांचन ऑफसेटचे मालक श्री. दिनकर नारखेडे व श्री. चेतन नारखेडे यांनी माफक दरात उत्कृष्ट छपाई करुन दिली, त्याबद्दल त्यांचेही आम्ही ऋणी आहोत.

जय गुरुदेव ...

... जनार्दन महाराज

ॐ

श्रीमत्सद्गुरवे नमः

आशीर्वाद

मानव हा सुखप्रीय प्राणी आहे. त्यामुळे त्याने भौतिक सुख प्राप्तीच्या साधनांत कितीतरी प्रगति केलेली आहे हे नित्यशः आपण पहातोच. पण त्या साधनांनी मनुष्याचे समाधान झाले असे मुळीच दिसत नाही. कारण त्यांची अधिकाधिक सुखसोयीची उपलब्धतेचि हाव अजून तशीच आहे व त्यामुळे त्यास मानसिक समाधान तर नाहीच पण शारिरीक स्वास्थ्य पण मुळीच लाभू शकत नाही. यंत्र आणि विज्ञान युगाने माणसालाही एका भव्य कृत्रीम यंत्र समुहाचा एक उपेक्षणीय सूक्ष्म भाग बनविला आहे. त्यामुळे त्याची सदैव धावपळ व मानसिक अस्वस्थता दिसून येते. सामान्य मनुष्याच्या जीवनाला हवा असलेला समतोल केवळ भौतिक अथवा वैषयीक सुखसाधनांनी पुरेसा होत नाही. त्यास नैतिक मुल्यांच्या जोपासनेची पण अत्यंत आवश्यकता आहे.

मनुष्याने आपले जीवन एका विशिष्ट नैतिक चाकोरीतून व्यतीत केल्यास मात्र त्यास भावनिक अथवा सात्विक सुख प्राप्तीचे समाधान होते असा आपल्या संत महात्म्यांच्या अनुभवावरुन त्यांनी सिध्दांत मांडलेला आहे व तोच खरा असू शकेल असे सूक्ष्म-सखोल विचारांती आपणासही कळून येईल.

या विशिष्ट नैतिक चाकोरीचे दिग्दर्शन प्रत्येक संत महात्म्यांनी, ऋषि, मुनी, महर्षींनी त्यांच्या त्यांच्या अनुभवाप्रमाणे निरनिराळ्या स्वरुपांत केलेले आहे. पण सर्वांचे अंतिम साध्य एकच आहे ते म्हणजे निश्चल, अविकारी परमसुखाची प्राप्ति हे होय.

मानसिक समाधानाची व आत्मिक शान्तिची म्हणजेच मोक्षपदाची प्राप्ति हेच प्रत्येक मानवाचे अंतिम लक्ष्म आहे हे अंतिम लक्ष्य साध्य होण्यास आवश्यक लागणाऱ्या साधनांचे संस्कार प्रत्येक मानवाने आपल्याच शरीरावर, मनावर व आत्म्यावर करावयाचे असतात, त्या योगेच ते साध्य होते.

ते अंतिम लक्ष्य साधण्याकरीता आपली ऐहिक आणि पारमार्थिक प्रगति ज्या योगे होईल अशा विशिष्ट नीतितत्वांची शिकवण प. पू. सद्गुरु श्री इमामशहा महाराज यांनीसुध्दा दिलेली आहे. आपली शारिरीक शुध्दता, मानसिक पावित्र्य व आत्मिक उन्नतीची वाटचाल कशी करावी याबाबतीत त्यांनी जे नियम सद्भक्तास उपदेशिलेले आहेत त्यास **'शिक्षापत्री'** हे सार्थ नाव दिलेले आहे. प्रत्येक सत् मार्गगामी व्यक्तीस अथवा सत्पंथी अनुयायास त्या विषयी माहिती असणे आवश्यक आहे व ती माहिती करवून घेणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

शिक्षापत्री अथवा शिखामण हा अगदी लहानसा पण अगाध नैतिक मुल्यांनी भरलेला ग्रंथ मूळ गुजराथी भाषेत असल्यामुळे प्रत्येक मराठी भाषिक व्यक्तिच्या लक्षात ताबडतोब येऊ शकत नाही. त्यामुळे त्याचे मूळ श्लोक कायम ठेवून त्याचा अर्थ मराठी भाषेत भाषांतरीत करुन छापण्याचा हा प्रयत्न केलेला आहे. श्री सत्पंथ नीतिशतकांतील सर्व नियम मूळचेच कायम आहेत पण त्यांच्या क्रमांत थोडा बदल केलेला आहे. सर्व नियम वाचतांना क्रमाक्रमाने वाचता यावे व समजावे याकरितां हा क्रमाचा बदल केलेला आहे. प्रत्येक सन्मार्गगामी मनुष्यास नीतितत्वांचे मार्गदर्शन त्यामुळे यथायोग्य होऊ शकेल अशी खात्री आहे.

शेवटी अशी एक सदिच्छा आहे की नित्यपाठाच्या दररोजच्या नित्य नियमीत कर्मानंतर प्रत्येक मनुष्याने ही शिक्षापत्री नियमीत वाचावी. व्यवसाय धंद्याच्या घाईगर्दीमुळे सकाळच्या वेळेस न जमल्यास दिवसा केंव्हाही

रिकामपणाचे वेळी अथवा रात्री झोपण्याच्या अगोदर तरी मात्र ही नियमावली अवश्य वाचावी. व्यवसाय धंद्याच्या धावपळीमुळे सकाळच्या वेळेस न जमल्यास दिवसा केव्हाही रिकामपणाचे वेळी अथवा रात्री झोपण्याच्या अगोदर तरी ही नियमावली अवश्य वाचावी. अशाप्रकारे दिवसातून एकदा तरी या शिक्षापत्रीचे वाचन झाल्यास सन्मार्गाच्या नैतिक चाकोरीची जाणीव आपणास होत जाईल व आपले मन हळू हळू पारमार्थिक तत्वांचा विचार व आचार करण्यास समर्थ बलवान बनू शकेल.

या नित्यपाठासारख्या लहानशा ग्रंथाच्या वाचनाने व त्यातील नियमांच्या विचाराने त्याच्या सतत चिंतनाने आणि प्रत्यक्ष त्या नियमांच्या आचरणाने प्रत्येक मानव आपली ऐहिक प्रगती, पारमार्थिक शाश्वत, सात्विक सुखशांति व आत्मिक उन्नतीची परिसीमा गाठू शकेल अशी सर्वांकडून अपेक्षा आहे.

– आचार्य श्री जगन्नाथ महाराज, फैजपूर

ॐ

श्रीमत्सद्‌गुरवे नमः

शिक्षापत्री शिकवण

श्री सतपंथाचे नियम, तत्त्वे व क्रियाचरण

प्रास्ताविक

श्री सद्‌गुरु ब्रह्मा उवाच । रखेश्वरो सांभळो अेकांते ।।

परमपूज्य ब्रह्मदर्शि श्री सद्‌गुरु इमामशाह महाराज सांगतात की अहो परमप्रिय ऋषीवर जन हो ! तुम्ही मन एकाग्र, शान्त व स्थिर करुन श्री सत्‌पंथाची तत्वे, त्याचे नियम व क्रियाचरण शान्त चित्ताने श्रवण करा, एकाग्र मनाने त्याचे वाचन करा आणि तसे वागण्याकरितां सतत निदिध्यास चिंतन करा.

दिन प्रत्येक करो धामसु धंदा ।
सांज पडे थावो स्वामीना बंदा ।। १ ।।

दररोज नित्य नियमाने आपल्या उपजिवीकेस आवश्यक असा सचोटीने व्यवसाय, कामकाज, धंदा करा, परंतु संध्याकाळच्या वेळी म्हणजे रात्री मात्र परमेश्वराचे दास, सेवक होऊन रहा. आरती, पूजाअर्चा, सायंसंध्या वगैरे नित्य कर्मे करुन परमेश्वराची आणि सद्‌गुरुची सेवा चाकरी करा. परमेश्वराचे सतत चिंतन व नामस्मरण एकाग्र मनाने करा. (१)

कोई केनी ना करशो निंदा ।
गुरु गतमा आवीने करो हे जिंदा ।। २ ।।

गुरु गतगंगेत कोणीही कोणाची निंदा, द्वेष वगैरे करुन नका. गुरु

मेळाव्याच्या ठिकाणी म्हणजे पुजेच्या वेळी एकत्रीत जमलेल्या जनसमुदायात - सत्संगाचे ठाई येऊन सर्वांना अत्यंत नम्र भावाने प्रणाम करा व गुरु महाराजांना साष्टांग नमस्कार करा. (२)

त्याहा तमे गुरु मुखे मेळवो ज्ञान ।
रखेश्वर केरी येही संध्यास्नान ।। ३ ।।

गुरुगतगंगेत अथवा सत्संगाच्या जनसमुहात दाखल होऊन तुम्ही गुरुमुखातून ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करा. गुरु महाराज जे ज्ञान उपदेशतील ते शांत चित्ताने व स्थिर मनाने श्रवण करा. सदैव त्यांच्याच आज्ञेत राहा. हे ऋषिवरा हीच खरोखर तुझी सायंसंध्या होय. संध्याकाळचा वेळ सर्वांना सोयीस्कर व निवांत असल्यामुळे ज्ञानश्रवणास व संध्यादि साधनास उत्तम असतो. (३)

संध्या करो मारा मुनिवर भाई ।
मेलो क्रोधने करो जीवनी कमाई ।। ४ ।।

अहो सुहृद मुनिजन हो ! तुम्ही दररोज नित्य नियमितपणे प्रातर व सायंसंध्या, ध्यान धारणादि विधी करा. पण त्या आधी आपल्या सर्वस्वाचा घात करणारा असा आपल्या अंगी मुरलेला जो अहंकार, क्रोध असतो त्याचा त्याग करा व मग अखेरपर्यंत जीवीताचे सार्थक करुन घ्या. अहंकाराचा त्याग झाल्याशिवाय ईश्वरभक्तीस आवश्यक लागणाऱ्या भगवत्प्रीति आदि साधनांचा उगम आपल्या चित्तात होऊ शकणार नाही. (४)

मन मारो तो ममता मुई ।
मंदिरमां न रहेसो सुई ।। ५ ।।

आपले मन माया ममतेत बद्ध होणारे असल्यामुळे प्रथम माया ममत्वविषयी मनाचे ठाई वैराग्य धारण करा. तीव्र वैराग्याच्या योगाने मनाचे उच्छृंखल भाव नाहीसे करा म्हणजे त्याबरोबरच माया ममत्वाचा सुद्धा लय होऊन जाईल. मंदिरात आल्यानंतर मनुष्याचे सर्वात महत्वाचे कार्य हेच आहे. म्हणून मंदिरात केवळ झोपण्याकरीता, आराम करण्याकरीतां किंवा

मुलाबाळांना रमविण्याकरीता, येऊ नका, तर त्या ठिकाणी वर सांगितलेल्या तत्वांचा सतत अभ्यास करा. ईश्वरभक्तीस शांततेची अत्यंत आवश्यकता असते. पुजेच्या वेळी लहानमुले गोंधळ करतात त्यामुळे शांततेचा भंग होऊन ज्यांची मने ईश्वरभक्तीकडे एकाग्र झालेली असतात ते सुद्धा ईश्वरभक्तीपासून परावृत्त होतात व सर्वत्र अशांतता पसरते, म्हणून पूजेच्या वेळी गोंधळ व अशांतता होणार नाही याची तरतूद करावी. (५)

मंदरमा कोई केनी वात न करशो ।
आहार घणो करी पेट न भरशो ।। ६ ।।

मंदिरात अगर पूजास्थानी आल्यानंतर कोणीही कोणाविषयी वादविवाद, भांडणतंटा, द्वेष, तिरस्कार, वैर, संताप वगैरे करु नका. मौन धारण करुन मन ज्यायोगे शांत व स्थिर होईल अशा प्रकारचा प्रयत्न करा. एकाग्र चित्ताने ध्यान करणे व मन शक्य तेवढे निर्विचारी करणें हाच मन स्थिर होण्याचा उपाय आहे, मंदिरात अगर कोठेही नेहमी एकमेकांशी प्रेमभावनेने वागा. आहार म्हणजे जेवण भरपूर करु नका. पोट फुगेल, एवढे जेवण कधीही करु नका. (६)

भरशो पेट तो भारी थाशो ।
आवशे निद्राने पछे पस्तावशो ।। ७ ।।

भरपूर जेवण केल्याने शरीर जड होते. सुस्तता येते. स्थुलपणा वाढून बुद्धि जड व मंद होते, कोणतेही काम करण्याची इच्छा होत नाही. मनुष्याच्या अंगी आळस उत्पन्न होऊन तो आपल्या कर्तव्य कर्मापासून परावृत्त होतो. अति आहाराने झोप जास्त येते व त्यायोगे शरीरांत आणि स्वभावात दलिद्री (निष्काळजीपणा), निर्बुद्धता, निरूत्साहीपणा निष्क्रियता येते, ही निद्रादेवीची नशा ज्यावेळेस उतरते तेव्हा मनुष्य कर्तव्य कर्मापासून ढळल्यामुळे निरर्थक पश्चात्ताप करीत बसतो. याकरितां आहार कमी प्रमाणात करा व आरोग्यास आवश्यक तेवढी झोपही नियमित प्रमाणात घ्या. (७)

हळवे पेटे हौसज थाशे । जागता जीतशो सद्‌गुरुनी साथे ॥ ८ ॥

जेवण कमी केल्यास हलके हलके तरल वाटू लागते व कोणतेही काम करण्यास उत्साह वाटू लागतो आणि ते काम यशस्वी रितीने पार पाडू शकतो. व्यायाम करणे सुलभ वाटते व त्यायोगे आपले आरोग्य सुधारते. कमी जेवणामुळे झोप, सुस्तता येत नाही व सर्व इंद्रियांना ताब्यात घेण्यास मन समर्थ बनते, मनाची चंचलता व विषयाकडची धांवही थोपविता येते. त्यायोगे सद्‌गुरु महाराजांनी सांगितलेल्या संध्यादि पूजा विधीत जीवात्म्यांचे पूर्णपणे लक्ष लागते मन केन्द्रित करण्यास सिद्ध होता येते. (८)

वडा मोटानी अदबे रहेजो । मोटा तणा बे अवगुण सहेजो ॥ ९ ॥

आपणापेक्षा ज्ञानाने, मानाने व वयाने कोणीही मोठे म्हणजे श्रेष्ठ असल्यास आपण नम्रभाव स्विकारुन त्यांच्याशी वागतांना आदबीने वागावे. मोठ्या माणसाचे अवगुण अथवा व्यंग शोधीत बसू नका. त्यांचे ठायी असलेले गुण मात्र अवश्य ग्रहण करा. (९)

दहाडो वडो तेने वरष करी जाणो ।
बोलो मीठा वचने प्रेम आणो ॥ १० ॥

एक दिवस एका वर्षाप्रमाणे मानून चला. कारण, परमेश्वर कृपेने प्राप्त झालेला नरदेह कोणत्या क्षणांत विरुन जाईल, हे समजणे अशक्य असते म्हणून प्राप्त परिस्थितीत अनुकुल रीतीने नीतिनियम युक्ततेने वागून आलेल्या संधीचा फायदा अध्यात्मिक उन्नतिकरितां करुन घ्या. सर्वांशी नम्रतेने, मृदुतेने व सत्यतेने बोलून स्वतःस प्रेमळ बनवा, कारण एकमेकांशी निःस्वार्थी, निर्विवाद्य, निर्विषयी प्रेम हेच मानवी जीवनाचे सार्थक होय.

आपणाथी जे नानेरो भाइ । तेणे बोलावो मोटेरो कही ॥ ११ ॥

जो कोणी मनुष्य आपणापेक्षा लहान असेल अगर आपल्या पाठचे लहान बहिण, भावंडे असतील त्यांच्याशीसुध्दां मोठेपणाचा मान देऊन वागा. त्यांना अरे कारे म्हणून अगर शिवीगाळ देवून हिणवू नका व

त्यांना विनाकारण मारुन मुकटून त्रास देवू नका. त्यांना उत्तम प्रकारच्या बोधपर गोष्टी शिकवून चांगले वळण लावा. (११)

अेवे मीठे वचन बोलो वीरा । तो तमारे मुखे झलके हिरा ।। १२ ।।

अशा प्रकारे तुम्ही गोड मृदु नम्र भाषेने सर्वांशी बोलू लागला तर तुमच्या मुखातून केवळ शब्दच नव्हेत तर अमौलिक असा एक एक हिराच निघाला असे लोक जाणू लागतील. जग आपलेसे करुन घ्यावयाचे असेल- आपणाविषयी सहानुभूति वाटून घ्यावयाची असेल तर सर्वांशी अगोदर बोलतांनाच प्रेमळ नम्रतायुक्त गोड व सत्य भाषा करा म्हणजे तुम्हाला हिऱ्याचे मोल येईल. सर्वजण तुमचा शब्द हिऱ्याप्रमाणे मानून तसे वागू लागतील. (१२)

सद्‌गुरु मळ्यानो ये छे भेद ।
ऋषिवर ऋषिवरनो ना करशो खेद ।। १३ ।।

सद्‌गुरु मिळाल्याचा हाच खरोखर भेद आहे. ज्याला खऱ्या सद्‌गुरुची प्रप्ति झाली तो मनुष्य अन्य जनांशी केव्हाही तुच्छतेने वागत नाही. कारण सर्व प्रथम सद्‌गुरुचे तत्व आहे की सर्वभूत प्राणिमात्रांचे ठायी वास्तव्य करणारा आत्मा-चैतन्य पुरुष एकच असल्याने सर्वांना आपल्या समानच वागवा व त्यांच्याशी त्याच भावनेने वागा, कोणीही आपापसात एकमेकांची निंदा, वैर, द्वेष, निषेद करुं नका. हे तत्व ज्यांच्या अंगी पूर्णपणे बाणले त्यावर सद्‌गुरु कृपा झालीच असे समजा. (१३)

अेवो सांभळी रुडूने ओचरवू कुडू ।
तो निश्चये जाणजो थाशे भोंडू ।। १४ ।।

गुरु मुखातून अथवा सद्‌गुरु वचनामृतातून चांगल्या चांगल्या श्रेष्ठ प्रतीच्या तत्वांचे ज्ञान ऐकून जर कोणी त्या विरहीत वागेल, ते तत्व सोडून वागेल म्हणजे जिवनांत वागतांना त्या तत्वाचा उपयोग करुन घेणार नाही तर निश्चयाने समजा की, त्या मनुष्याचे कल्याण कशानेही

कधीही होणार नाही. तत्व विरहीत वागल्याने सदैव अकल्याणच पदरी पडते. (१४)

आळस निद्रा मत करो जाणी ।
जुठ त्यजो वेद वचन प्रमाणी ।। १५ ।।

एकदा वेळेचे महत्व तुम्हास समजल्यानंतर वारंवार जाणून बुजुन आळस निद्रा यांत आपले अमौलिक जीवन व्यर्थ घालवू नक. जे खोटे असेल असत्य असेल, विनाशशील असेल त्याचा ताबडतोब त्याग करा व जे अविनाशी तत्व असेल, सत्तत्व असेल, वेदवाणी असेल, तीचा स्विकार करा. (१५)

कुड कपट सर्वे नाखो कहाडी ।
घेरथी धर्मद्वारे आवो दहाडी ।। १६ ।।

दररोज सतत नियमीतपणे धर्मद्वारी म्हणजे मंदिरात अगर पूजास्थानी यावयास हवे आहे, मात्र येतांना सोबत कुड, कपट, द्वेष, निद्रारुपी कुत्रे आणावयास नको, ते सर्व बाहेरच सोडून यावे. मंदिरात अगर पूजास्थानी येतांना मन शांत, स्थिर व प्रसन्नतायुक्त, उदार व परोपकार बुध्दीने प्रेरीत असावे. (१६)

उपजे भाव निशाणी लावो । संपत उपजें ते तमे लावो ।। १७ ।।

मंदिरात अगर पूजेस येतांना सोबत काहीतरी प्रसाद अगर तत्प्रित्यर्थ जे आपणास योग्य वाटेल त्या वस्तु आपल्या परिस्थिती अनुसार आणाव्यात, आपल्या घरी, शेतात ज्या वस्तु पिकलेल्या असतील, धनधान्य, फळे भाजीपाला, दुध, मेवामिष्ठान्न वगैरे त्यातून अल्पांशाने का होईना, पण निशाणी-प्रसाद म्हणून मंदिरात, पूजास्थानांत अगर आपण पवित्र मानलेल्या स्थळी अर्पण कराव्यात. जी काही आपल्या घरात संपदा, संपन्नता झालेली असेल ती सर्व परमेश्वराची कृपा आपणावर आहे म्हणूनच होत असते. ती वाढावी अगर स्थिर व्हावी आणि आपल्या प्रयत्नांना परमेश्वरी शक्तीचे

सहाय्य लाभावे एतद् प्रित्यर्थ परमेश्वराच्या कृपादृष्टीकरितां व त्याच्या तेवढ्या अगम्य अपार ऋणांतून मुक्त होण्याकरीता अल्पांशाने का होईना परंतु शुध्द भाव भक्तियुक्त .अंतःकरणाने ह्या गोष्टी करणे अगत्याचे असते.

(१७)

स्वामीनी गुंजडिया मत कोई खाशो ।
मुखी साथे ना करशो दावो ।। १८ ।।

ज्या लोकांनी महान् सद्‌भावनेने मंदिरास अगर पूजास्थानास तेथील दिवाबत्तीच्या अगर पूजाकार्य आदि सुरळीत चालण्याकरीता आणि सदाव्रत (अन्नसत्र) वगैरे साठी लागणाऱ्या अन्यान्य खर्चाकरीता काही स्थावर जगम धन, संपत्ति, माल, घरदार, शेतीवाडी, अन्नधान्य शिंधासामुग्री वगैरे जे काही अर्पण केलेले असेल, त्याचा अपहार (चोरी) करू नये किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क गाजवू नये. तसे केल्यास दान करणाऱ्या जिवात्मांच्या सद्धेतूस तडा जातो व त्यांच्या आत्मा कळकळीच्या योगाने त्याचा उपभोग घेणाऱ्या अधम, नीच, जीवात्म्याचे कधीही कल्याण होत नाही. तसेच जे मुखी-पूजा करणारे असतील अगर गादिपति, गुरु आचार्य असतील त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा वैरभाव, दावाफटका, निंदा द्वेष तिरस्कार वगैरे करु नयें. (१८)

दावो करे ते दुनियाने भावे ।
आवे दारिद्र ने देव ना पावे ।। १९ ।।

वर सांगितल्याप्रमाणे कदाचित कोणी केल्यास त्यांना कोणतेच सद्विचारी लोक चांगले म्हणणार नाही. कदाचित सामान्य अज्ञानी व भोळी जनता त्यांना चांगले म्हणेल व दुष्ट प्रवृत्तीचे लोक त्यांच्या कार्यास प्रोत्साहन देतील परंतु त्या योगे त्यांनी निश्चित समजावे की त्यांची अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही. तशा दारिद्रयांना, नीतिभ्रष्टांना, क्रियाभ्रष्टांना परमेश्वरदर्शन तर अतिशय दूर असते. उलट त्यांचे मुख पाहिल्याने पाहणारास सुध्दा भ्रष्टता येते. पाहणारांना ब्रह्महत्तेचे पातक लागते तर तसे नीच कर्म

करणारास कोणते पातक लागेल याचा ज्यानी त्यानीच विचार करावा. (१९)

अधरमीने उणीया आचारी । जाण्यु अजाण्यु देखाडे पचारी ॥ २० ॥

जे अधर्मी असतात ते उणियाचारी म्हणजे धर्मशास्त्राच्या उलट आचरण करीत असतात असे लोक शास्त्रांतले व्यंग निवडून त्याप्रमाणे उलट आचार करतात व जाणून बुजुन अग्नीवर पाय देतात. धर्मशास्त्रातील तत्वांविषयी माहिती असून सुद्धा त्याविषयी अज्ञानपणाचे पांघरुण पसरवितात. त्या क्रियाभ्रष्टांची सुध्दां अधोगतीच होते हे निश्चित समजावे. (२०)

धरमी धिंगाणानी दात न जाणे। अधरमी मनमाहे ओछु आणे॥२१॥

जे खरे धर्मी असतात, सत्यतेने सद्गुरुवचनानुसार शुध्द धर्माचरण करण्यात तत्पर असतात, ते धर्माच्या बाबतीत कोणताच धिंगाणा, ढोंगीपणा करीत नाहीत त्यांचे लक्ष केवळ धर्माचरणात असल्याने इतर मानमरातब, रागद्वेष, आत्मश्लाघा (बडेजाव) इ. क्षुल्लक बाबतीत ते मुळीच लक्ष घालू शकत नाहीत. परंतु जे खरे अधर्मी असतात, कुड कपटी, निंदक, क्रियाभ्रष्ट, कुटिल असतात ते मात्र आपला मानमरातब, आढ्यता, श्लाघा, इ. बाबतीत एवढ्या काही बारकाईने लक्ष देतात व तसे कोणी न केल्यास मनात एवढा काही नीचपणा आणतात की, धर्माच्या नावाखाली शुध्द अधर्माचरण करुन लोकांना फसवितात. परंतु अंती तेच फसतात, अशा लोकांपासून आपण शक्य तेवढ्या लांब व साधव राहावयास हवे आहे. त्यांच्याशी संबंध ठेव नये. (२१)

ज्ञान ध्यान माहे जुवो विचारी ।
हाण वृध्दी दिलमाहे शोधो तपासी ॥ २२ ॥

ज्ञानाच्या बाबतीत आणि ध्यानाचे बाबतीत मनुष्याने चौकस राहावयास हवे आहे. आपणास त्याविषयी काही माहिती नसल्यास आपणापेक्षा जे ज्ञानाने श्रेष्ठ असतील अशा व्यक्तिकडून अगर गुरुकडून ते ज्ञान प्राप्त करावे

आणि आपणाकडून हीन आचरण घडत आहे किंवा चांगले आचरण घडत आहे याचा वारंवार आपल्या मनाचे ठायी शुध्द अंतःकरणाने विचार करुन हीन प्रकारचे आचरण सोडून द्यावे. व चांगले नितीनियमयुक्त तत्त्वांचे आचरण करावे. (२२)

सुतक लाई भर्या जो रहेशो । उपजे हाणने बहु दुःख सहशो ॥ २३ ॥

जे सुतक लाईच्या-अशुद्धतेच्या नियमयुक्त असतील त्यांनी त्या अशुध्दतेतून मुक्त व्हावयास हवे. सुतकातून मुक्त होणे म्हणजे स्त्री प्रसूत झाल्यापासून सव्वा महिन्याने म्ह. ४० दिवसांनी गृहकृत्य करण्यास स्पर्श करण्याच्या अगोदर पत्नी व पति या दोघांनी मंत्रोपचाराने तीर्थ प्रायश्चित्त घेणे. शुध्द व पवित्र व्हावे इतर गोत्रजांनी १२ व्या दिवशी म्हणजे वृध्दीमुक्तीनंतर विरद्धी मोकळी झाल्यानंतर मंत्रोपचाराने तीर्थ प्रायश्चित्त घेणे. स्त्रियास ऋतृकाळ समाप्तीनंतर म्हणजे साधारणतः पाचव्या दिवशी स्नान करुन मंत्रोपचाराने तीर्थ प्रायश्चित्त घेणे. व अशारीतीने शुचिर्भूत होऊन नंतरच गृहकृत्यास स्पर्श करणे यास शरीर शुध्दीच्या क्रिया म्हटलेले आहे. या क्रिया जो मनुष्य अथवा जी स्त्री करीत नाही त्यास संसारात अनेकानेक प्रकारच्या अडचणी, हाल अपेष्टा दुःख, क्लेश, रोगराई अचानक संकटे वगैरे भोगावी लागतात. त्यापासून त्रास होऊ नये म्हणून वरील सांगितलेल्या क्रिया निर्धाराने पाळावयास हवे आहे. (२३)

अमी निशाणी जो लेवे न दहाडी ।
तेणे सतगुरु मलशे कहाडी ॥ २४ ॥

जो मनुष्य दररोज सकाळ संध्याकाळी मंदिरात दर्शनास येणार नाही आणि ज्या दिवशी पूजा होईल त्या दिवशी पूजेला हजर राहणार नाही, पूजेचा तीर्थप्रसाद ग्रहण करार नाही तो सद्गुरुच्या मेळाव्यातून विन्मुख राहील. सद्गुरुच्या कृपादृष्टीपासून तो दूर होईल. त्यावर सद्गुरुकृपा अथवा ईशकृपा होणार नाही. म्हणून संतत पूजेला हजर राहावे. त्यावेळेस मला

सांगितले नाही, मला पूजा करणाराने आमंत्रण दिले नाही, मी कसा येऊ? अशा प्रकारचा अधर्मीपणा करु नये. जेव्हा जेथे माहित पडेल तेव्हा तेथे पूजेला हजर राहावे. कारण पूजेला आल्यानंतर मंत्र श्रवण, मनन एकाग्रतेने ईश्वर चिंतन, नामस्मरण ध्यान, धारणा सद्‌गुरुंचा कृपाशिर्वाद, तीर्थप्रसाद सेवन, सत्संगाचा लाभ यामुळे पूजेचे आमंत्रण देणारापेक्षा आपलीच अधिक उन्नति होत असते. (२४)

ध्यान धरी हाते लेवो सुमरणी । छाना छूपी करो उत्तम करणी ॥ २५ ॥

पूजेला येतेवेळी जमल्यास स्नान करुनच यावे. दररोज धुतलेले पांढरे स्वच्छ कपडे घालून यावे. नंतर पूजास्थानी आल्यावर प्रथम हातपाय धुवून स्वच्छ करावेत तदनंतर अपवित्रास पवित्र करण्याचा छाट घ्यावा व उद्‌धुप घेऊन शुद्ध व पवित्र होऊन हातात जपमाला घेऊन गुरु मंत्राचा सतत जाप करावा. ज्यावेळेस मंत्र म्हणणे चालू असते, त्यावेळेस मंत्राकडे पूर्णपणे लक्ष असावे. मन पूर्णपणे मंत्राकडे केंद्रित करावे इतर व्यवहाराकडे म्हणजे कोण काय करतो याकडे बघू नये. सतत ॐ चे स्मरण व ज्योतिकडे दृष्टी करून ध्यान करावे. अशाप्रकारे आपणामध्ये जे काही वाईट असेल त्याचा त्याग करावा. ज्या काही नीतितत्वांचा आपणात अभाव असेल ती सर्वग्रहण करावीत व चांगल्या प्रकारची नीतिनियमांनी युक्त अशी उत्तम करणी करावी. (२५)

अेवा गुणगंभीरे भरीया । ऋषीवर पाळो सो ये क्रीया ॥ २६ ॥

ते उत्तम प्रकारचे नीतिनिमय कोणते? या विषयी सद्‌गुरु महाराजांनी गुण गंभीरतेने भरलेल्या सत्य धर्माच्या खालीलप्रमाणे शंभर क्रिया सांगितलेल्या आहेत, त्यात शरीराची बाह्य शुद्धि म्हणजे पावित्र्य यास बाह्यशौच असेही म्हणतात व अंतशुद्धि म्हणजे मानसिक आणि आत्मिक शुद्धि, म्हणजेच व्रतोपवास, पथ्य, आहार इ. च्या योगाने प्रत्येक अवयव शुध्द राखणे आणि यमनियम, शमदमादि षड्‌संपत्तीची शास्त्रशुध्द मार्गाने

जोपासना करणे त्यास आंतशौच असे म्हणतात. या सर्व क्रिया या वरील गोष्टींमध्ये विभागलेल्या आहेत. त्याचा मनुष्याने नीट अभ्यास व विचार करुन त्यानुसार आचरण केले म्हणजे तो खऱ्या अर्थाने कलियुगातील ऋषिवर समजला जाईल. याकरिता हे ऋषीवर्यांनो त्या क्रिया, ती तत्वें नियम कोणते हे नीट लक्षपूर्वक ऐका. त्यांचे मनन करा व ती तत्वें अंगी बाणविण्याचा सतत दृढतेने प्रयत्न करा. (२६)

श्री सत्पंथ नीतिशतक.

शारिरीक शुध्दता, मानसिक पावित्र्य आणि आत्मिक उन्नतीविषयी नियम

१) प्रथम हिरदे धोई निर्मल करीये

सर्व प्रथम शरीरशुद्धिपेक्षाही मनुष्याने आपले हृदय निर्मळ करावायास हवे आहे. बाह्य शुध्दता कितीही सांभाळली पण हृदय निर्मल नसल्यास कोणताही उपयोग नाही. मनुष्याने सर्व प्रथम आपले अंतःकरण शुध्द करावे. मन पवित्र ठेवावे, कोणत्याही मायाविकारांनी ते विटाळू नये. आहार व्यवहारावरसुध्दां हृदय शुद्धि बहुअंशी अवलंबून असते. आहार शुध्द, युक्त, समतोल असला म्हणजे त्याचा आपल्या शरीराच्या, मनाच्या व हृदयाच्या घडणीवर अनुकूल परिणाम होतो.

२) बीजी क्रिया शरीरशुद्धि करीये.

दुसरी क्रिया म्हणजे शरीरशुद्धि करावी. शरीरशुद्धिलाही अंतःकरण शुद्धि एवढे विशेष महत्व आहे. शरीर शुध्दिशिवाय मानसिक पावित्र्य राहू शकत नाही. ही शरीरशुद्धि कशाप्रकारे करावी त्याचे नियम पुढील प्रमाणे आहेत.

३) मेदान जई आवीने पाच आचमन किजे.

शरीर शुद्धिकरिता प्रथम शौच कर्माचा नियम आहे. बहिर्दिशेस-शौच्यास जाऊन आल्यानंतर प्रथम डावाहात नंतर उजवा हात व नंतर दोनही हात आणी पाय चांगले माती लावून घासून धुवावेत. नंतर शुध्द पाण्याने पाच आचमन म्हणजे गुळणे करुन तोंड धुवावे.

४) पाणी लइने लघुनीत करवूं, आचमन त्रण करवा सही.

लघुशंकेस म्हणजे लघवीस जातांना सोबत पाणी घेऊन जावे. मुत्र विसर्जनानंतर उपस्थेन्द्रिय चांगले धुवावे नंतर हात व पाय धुवून

तीन आचमन करावे.

५) माटी लइने धोवो हात, दांत, मुख धोई करवूं स्नान.

दररोज सकाळी साधारणतः ३ ते ४ वाजण्याचे सुमारास उठावे. माती लावून, दात मंजन लावून, चांगल्या प्रकारे घासून धुवावे त्याचप्रमाणे तोंडसुध्दां शुद्ध पाण्याने चांगल्या प्रकारे धुवावे व नंतर थोडा थोडा-प्रकृतीस झेपेल असा शास्त्रोक्त व्यायाम करावा त्यावर आपले आरोग्य अवलंबून असते.

६) नहाई करी निश्चे थावो पाक.

दररोज स्वच्छ, भरपूर पाण्याने स्नान करुन शरीर घासून पुसून स्वच्छ व शुचिर्भूत करावे.

७) निर्मल थइने धरवुं ध्यान.

स्नान केल्यानंतर निर्मळ झाल्यावर गंध, पुष्प, उद, धूप, दिपादिके करुन नित्यपाठ पूजा, अर्चा नामस्मरण, स्तुति प्रार्थना इत्यादिके करुन परमेश्वराचे व सद्गुरुचे पूजन व त्याचे ज्योतिस्वरुपातून ध्यान करावे.

८) प्रभाते न्हाई करीने बाहर निसरवू.

सकाळी स्नान झाल्यानंतर निसर्गाच्या मोकळ्या व शुद्ध हवेत बाहेर फिरावयास जावे. स्नान केल्याने मनास प्रसन्नता वाटते. शुद्ध हवेच्या योगाने हृदयात साठलेल्या दुषित हवेस व विचारास बाहेर काढून टाकण्यास मदत होते.

९) अनगळ नीर ना पीऊ पाणी.

पाणी वापरतांना नेहमी गाळूनच वापरावे. न गाळलेले पाणी कधीही कोणत्याही कामात वापरू नये. आरोग्यदृष्ट्या हा महत्त्वाचा नियम आहे.

१०) जीव जंतूने न मारवूं जाणी

जीव जंतू, मुंगी, माकोडा वगैरे निरुपद्रवी प्राण्यांना मारु नये त्यांच्यापासून उपद्रव होऊ नये म्हणून अगोदरच तशी खबरदारी घ्यावी. 'अहिंसा परमोधर्मः' ही सत्पंथाची आद्य शिकवण आहे.

११) शुचिर्भुत थइने नीत नीत जमीये.

शुचिर्भूत होऊनच नित्य नियमित शास्त्रोक्त विधीयुक्त जेवण करावयास हवे आहे. जेवण करतांना कुविचार वा अन्य दुष्ट भाव मनात ठेवू नये. कारण तसा परिणाम भक्षण केलेल्या अन्नावर घडतो व त्याच्या पचनापासून निर्माण होणाऱ्या जीवनरसावर म्हणजे रक्तावर त्याचा तसाच परिणाम घडतो आणि त्याचाच परणिाम पुढे मनावर होत असल्यासकारणाने जेवण करतांना शुद्धभाव व सद्विचार जागृत ठेवावयास हवा आहे. 'जसा आहार तसा ढेकर' ही म्हण त्याच संबंधाने प्रचारात आहे.

१२) अन्नने खारू मादू कहेवुं नही, वखाणवुं पण वखोडवुं नही.

जेवण करीत असतांना अन्नास खारट, अनलवण, तिखट, आंबट, खराब इ. नांवे ठेवून हीणवू नये, कारण अन्न हे ब्रह्म आहे. त्याची नेहमी स्तुति करावी पण निंदा, अवहेलना मात्र करु नये. जेवण करण्याचे सुरवातीस खालील श्लोक म्हणतात.

अन्नं ब्रह्म रसो विष्णूः भोक्ता देव जनार्दनो ।
येन युक्ते न तो भुङ्क्ते अन्नदोषो न लिप्यते ।।

याचा अर्थ असा की, अन्न हे ब्रह्म आहे आणि त्यापासून तयार होणारा जीवनरस विष्णूचा अंश आहे. ते अन्न ज्याकरिता खावे लागते तो प्राण जनार्दन आहे हे जाणून जो अन्न ग्रहण करतो त्यास अन्नदोष बाधू शकत नाही. म्हणून अन्नाची निंदा वा हेटाळणी न करता सदैव स्तुति करावी. अन्न आणि पाणी हे आपले जीवन आहे.

१३) हिंडता चालता खावूं नही.

हिंडतांना फिरतांना अगर चालत असतांना कोणतेच पदार्थ खाऊ नये. एकाठिकाणी स्थिर बसूनच सावकाश आणि परमेश्वराचे नामस्मरण करीत जेवण करावे. जेवतांना रिकामी बडबड करू नये.

१४) भोजन छांडी उठऊं नही.

जेवण करीत असतांना मध्येच उठून जाऊ नये. तसे केल्यास अन्नाचा अपमान होतो.

१५) चापी आहार न करशो भाई

जेवण भरपूर चापून चोपून करु नये. त्यायोगे शरीरास स्थुलता येते, मनुष्य सुस्त व आळशी बनतो, निरुत्साही व मंदमति बनतो म्हणून केव्हाही पूर्ण पोटभर जेवण करु नये. तीन चतुर्थांश भागाएवढे जेवण करणे आरोग्यदृष्ट्याही उपयुक्त असते.

१६) बोट्यू, टाढू, झुटु, ,खावुं नही.

बाटलेले अन्न म्हणजे निषीध्द वा दोषांनी युक्त असलेले अशुध्द अन्न खाऊ नये. अन्न तीन प्रकारांनी दुषीत होते. १) जाती दोष म्हणजे स्वभावतःच सदोष असलेले अन्न अथवा पदार्थ खाऊ नये, उदा. कांदा, लसूण, इ. २) आश्रयदोष म्हणजे वाईट चालीच्या दुष्ट व्यक्तीच्या हातचे वा घरचे अन्न अशुध्द असते. दुसऱ्याकडून लुबाडलेले, अन्यायाने चोरलेले अन्न खाऊ नये. ३) निमित्तदोष-धूळ, केस, कचरा वगैरेंनी दुषीत झालेले अन्न अशुध्द असते.

प्रत्येक मनुष्याचे शरीर सत्व रज व तम या त्रिगुणांच्या सामुग्रीतून निर्मिले जाते. यापैकी सत्वाचा प्रकर्ष-वाढ-अध्यात्मिक उन्नतिसाठी अत्यंत आवश्यक आहे. आहाराद्वारे जी द्रव्ये आपण शरीरात घेतो त्याचा आपल्या मनाच्या घडणीवर फार परिणाम होतो. जे मांस, मद्य आदि तामसिक पदार्थांचे

सेवन करतात त्यांचे ठायी निष्ठुरता, क्रूरता, निदर्यता आदि दुर्गुण जास्त प्रमाणात असतात. अतिशय तिखट अतिशय खारट, अधिक आंबट, अतिकडू, चमचमीत मसालेदार, अतिशय गोड, तेलकट, गरमागरम अतिशय रुखट-करपलेले अन्न राजसी असते. तसेच शिळे, सडलेले-कुजलेले, उष्टे खरकटे, अपवित्र, दुर्गन्धयुक्त अन्न तामसी असते.

या राजसी तामसी आहाराने काम, क्रोध, लोभ, मोह, अभिमान, मत्सर आदि दोष उत्पन्न होऊन मनुष्याचे शारिरीक व मानसिक स्वास्थ्य बिघडते आणि तो सद्वर्तनापासून, सत्साधना पासून दुरावतो.

गीता अ. १७। श्लोक ८ ते १०

१७) झुटु पशूने घालवू नही.

उष्टे, खरकटे, कुजलेले, अतिशय शिळे खराब झालेले अन्न पशुलासुध्दा घालू नये.

१८) वण पुछु खाधा बहु छे पाप.

आपला हक्क नसलेले पदार्थ, मालकास न विचारता खाणे महान् पापकर्म आहे खायची वस्तू आहे म्हणून खाल्ली अशी मनाची वेडगळ समजूत करुन घेऊ नये त्या वस्तूच्या मालकास विचारुन त्याची परवानगी घेऊनच खावी.

१९) भांग, तंमाकू न खाशो काई.

भांग, तंबाखू, विडी सिगरेट, नास, हुक्का, गांजा इ. अंमली पदार्थ खाऊ, पीऊ नये.

२०) मादक आहार अमल तजोरे भाई.

मादक पदार्थांचा म्हणजे गुंगी आणणाऱ्या उदा. लसूण, कांदा, हिंग, अफीण, ताडी, मांस, मदिरा इ. मादक पदार्थांचा व अशाच अनेकानेक अंमली पदार्थांचा सर्वस्वी त्याग करावा. अंमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या

मनुष्याकडून ईश्वर साधना कदापि होऊ शकत नाही.

२१) गुळीना वस्त्र पेहेरवूं नही.

'गुळी, नांवाच्या पदार्थापासून तयार केलेल्या, काळ्या रंगाने रंगविलेले काळे वस्त्र नेसू नये. कारण त्या पदार्थांची घाण वास येते. सदैव पांढरे शुभ्र धुतलेले वस्त्र परिधान करावे. त्यायोगे मन प्रसन्न व शुचिर्भूत होते.

२२) नीचनी संगत करवी नही.

हलकट विचाराच्या, नीच प्रवृत्तिच्या मनुष्याची संगत कधीही करु नये. कारण 'संगती संगदोषः' वाईटांच्या-असद् प्रवृत्तिपर लोकांच्या संगतीत राहिल्यास तशीच आपली बुद्धी होईल. म्हणून सदैव सत्शिल मनुष्याची संगत करावी म्हणजे नित्य सत्संग करावा. त्यायोगे चित्तवृत्ती सदैव सद्विचारी राहते व मनुष्याची अध्यात्मिक उन्नति होते.

२३) पगडी वाकी न बांधशो भाई.

पगडी वाकडी बांधू नये. फेटा, टोपी, वगैरे तिरपी घालू नये म्हणजे लोकांत विनाकारण आढ्यता दाखवू नये, शेखी मिरवू नये.

२४) वडा लुडाने मानवो सही.

ज्ञानाने, मानाने वयाने लहान अगर मोठ्यांशी वागतांना अदबीने वागा. लहान असला म्हणून त्याची बेअदबी करु नये. मान सन्मानाने सर्वांना वागवावे.

२५) अरु परु न करशो दुःखी.

कोणालाही अरे, कारे, अबे अशा उध्दट शब्दांनी अद्वा तद्वा बोलून दुःखी करु नये. बोलतांना सदैव मृदु व प्रेमळ वाणीचा अवलंब करावा.

२६) पडोशीने दुभी न करशो दुखी.

शेजाऱ्या शेजाऱ्यात दुही, भांडणतंटा करु नका. विनाकारण एकमेकांशी

लावालावी वितुष्ट करुन दुःखी-कष्टी करु नका.

२७) केने गाळ न दिजीये जाणी.

कोणालाही शिवीगाळ करु नये. जाणून बुजून एखाद्या कडून अपराध जरी घडला तरी त्यास शिवीगाळ करु नये. चांगल्या शब्दांनी त्यास समज द्यावी.

२८) कोईनी अयब न उघाडवी जाणी.

कोणाचाही अयब-व्यंग काढू नये. जरी आपणास माहीत असेल तरी ते उघड करुन कोणास दुखवू नये.

२९) सऊ गाळ शांखवीने क्रोध न करवो.

कोणी आपणास समजून उमजून शिवीगाळ जरी केली, मुर्ख मैंद, कपटी, मुकीर षंढ वगैरे जरी काही म्हटले तरी आपण रागावयास नको. त्याच्या मुर्खपणाबद्दल त्यास समज द्यावी पण रागाऊ नये-त्यावर क्रोध करु नये.

३०) अवगुण करे तासु गुणज करवो.

कोणी आपणास त्रास दुःख जरी दिले तरी त्याच्या अवगुणाकडे न बघता त्याच्याशी गुणयुक्ततेनेच वागावे. त्याच्या अवगुणाविषयी अप्रत्यक्षपणे त्यास समज द्यावी. पण तो तसे करतो म्हणून मी सुद्धां असे करीन, अशा व्यर्थ ईर्षेस पेटू नये. त्यायोगे दोघांचेही अपरिमीत नुकसान (आर्थिक तशीच नैतिक हानी) होते.

३१) भांजगड कोईथी करवी नही.

कोणाशीही भांडखोरपणा, तंटाबखेडा, फिर्यादफाटा वैरभाव वगैरे करु नका. समजदारपणाने सर्वांशी वागण्यास व वागविण्यास शिकावे.

३२) जोर जवानी वश जो करवी.

आपल्या जोर जवानीची-यौवन-तारुण्य-शक्तिची व्यर्थ घमेंड करु नये व

तसल्या घमेंडखोरपणाची इच्छा पण करु नये. ते सर्व आपल्या स्वाधीन करावे. त्यांच्या आहारी आपण जाऊ नये. सर्वेन्द्रीयांना आपल्या ताब्यात ठेवावे. त्या योगे मनुष्याचे अधःपतन होत नाही.

३३) ओछु केने आपवू नही, अधिकु कोईनु, लेवू नही.

माल मोजून देतांना कोणासही हात चलाखीने अगर दांडीस झटका देऊन (दीडदांडीने) माल कमी देऊन कोणाचा विश्वासघात करु नये व घेतांना सुध्दा कोणाचा माल योग्य किंमत दिल्याशिवाय घेऊ नये.

३४) लालच प्रीत न करशो भाई.

लाचलुचपत अगर एखाद्या गोष्टीच्या प्राप्तीच्या लालसेविषयी मनात प्रीती बाळगू नये कारण लालसेत पडलेल्यांचे तोंड काळे होते असे शास्त्रवचन आहे.

३५) माता पिता गुरु तणा वचन पालवां निरधार.

माता, पिता, आणि गुरु यांच्या सदैव आज्ञेत राहा. त्यांच्या आज्ञा पाळा. त्यांची मनोभावे सेवा करा.

३६) माता करी जाणो वडिल भवजाई.

आपल्या वडिल भावजायास म्हणजे आपणाहून वडील मोठ्या असलेल्या भावांच्या स्त्रीयांस आपल्या आई समानच माना व त्यांच्याशी तसेच आचरण करा.

३७) धर्म तणुं आळस न करवूं.

धार्मिक कार्यांच्या बाबतीत म्हणजे मानवी जीवीज उन्नतिप्रत नेण्याकरीता आचराव्या लागणाऱ्या कोणत्याही धर्म, कर्म कर्तव्यांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा आळस अगर दिरंगाई करु नये.

३८) नीत नीत गतमाहे मलीये जाई.

नेहमी नेहमी गतगंगेच्या सत्संगात मिळून मिसळून वागावयास हवे आहे. पूजेच्या ठिकाणी कोठेही न चुकता वेळेवर अवश्य जावयास हवे आहे.

३९) वखत वेळा न चुकवूरे प्राणी.

कोणतेही काम करण्याची वेळ चुकता कामा नये. ज्यावेळेस जे काम करण्याचे नेमलेले अगर ठरविलेले असेल त्यावेळेस ते अवश्य केलेच पाहिजे. त्यात आळस करता उपयोगाचे नाही. देव-पूजा, नित्यपाठ, आरती, भजन, पूजन वगैरे बाबतीत नेमलेला वेळ न विसरता त्यास कार्यास वेळेवर हजर व्हावयास हवे आहे.

४०) गुरु मुखी गतमाहे नमवूं धाई.

पूजेला आल्यावर प्रथम गुरुचरणीं नमस्कार करुन नंतर सर्व गतगंगेस म्हणजे पूजेला आलेल्या मुखी व इतर सर्व लोकांना अत्यंत व्रम भावाने प्रणाम करावा.

४१) नीत नीत अमी पीवे ते धर्मी,

जो नेहमी नेहमी एकही वेळ न चुकता पूजेला हजर राहील व सद्गुरु चरणामृत पान करील, गुरुवचनामृत प्राशन करील म्हणजे गुरुचे वचन शिरोधार्य मानून त्याप्रमाणे वागेल तोच धर्मी खरा सत्पंथी होय.

४२) अहंकार न मुके ते कुकर्मी.

गुरु वचनामृत श्रवण करुन जो अहंकार, काम, क्रोध, मद-मत्सर वगैरे दुष्ट भाव सोडणार नाही तो कूकर्मी होय.

४३) सुरीजन साथे ध्यानज धरवू.

पूजेला आल्यानंतर घरगुती गोष्टी कोणत्याही करीत बसू नये. सृष्टीपालक, विश्वव्यापक, परब्रह्म परमेश्वराचे निकलंकी नारायणाचे तेजोरुपाने ध्यान व नामस्मरण चिंतन करावे.

४४) दसवंत सुक्रीत गुरुद्वारे देवूरे भाई.

पूजेमध्ये दसवंत सुक्रीत आदि दानविधी प्रत्येकाने अवश्य करावा. दसवंत

ही परमेश्वराच्या ऋणातून मुक्त होण्याकरीता उत्पन्नाचा दहावा भाग. सुक्रीत हे गुरुच्या ऋणातून मुक्त होण्याकरीता उत्पन्नाचा विसावा भाग. अशाप्रकारे दसवंत सुक्रती आदि दान धर्माचा विधी परमेश्वराच्या नावाने मंत्रोपचाराने ब्रह्मार्पण करुन तो भाग गुरुद्वारीमंदिरात धर्मप्रचार व दीनदुर्बलांच्या सेवेकरीता अर्पण करावा.

न्यायोपार्जितवित्तस्य दशमांशेन धीमता॥
कर्तव्यो विनियोगश्च ईशप्रीत्यर्थमेव च॥

स्कन्दपुराण, माहेश्वर खंड - केदार खंड १२।३५

अर्थ : आपण न्यायपूर्वक उपार्जित केलेल्या संपत्तीचा दहावा भाग म्हणजे दसवंत ईश्वराच्या प्रसन्नतेकरितां कोणत्याही सत्कार्यास धर्मदाय द्यावा हे बुध्दिमान मनुष्याचे उचित - उपयुक्त कर्तव्य आहे.

४५) युगतीथी व्रत उपवास करवूं सही.

युगतीथींच्या व्रताचा उपवास अवश्य करावा. प्रचलित समयी चालू असलेल्या युगतीथींचा म्हणजे चन्द्रदर्शन, अजवाळी बीज व त्याचप्रमाणे एकादशी, अनंत चतुर्दशी, सोमवती अमावस्या इ. तीथींचा व्रतोपवास शास्त्रोक्त पध्दतीने अवश्य करावा. कोणताही उपवास निरंकार निर्जल करावा. त्यादिवशी कोणत्याही प्रकारचे अन्न, पेय, अंमल वगैरे सेवन करु नये.

४६) युग प्रमाणे अवतारने ध्यावोरे भाई.

युगधर्मानुसार सांप्रतकाळी प्राधान्य असलेल्या अवतार पात्राची म्हणजे निकलंकी नारायणाची भक्ति करावी, ज्योत स्वरुपाच्या साधनाने त्यांचे ध्यान करावे, व मुखातून सदैव त्यांच्याच नामाचा जयघोष करावा.

४७) सुपात्रने दान देवूरे प्राणी.

पात्रापात्र पाहून-विचार करुन सुपात्रास योग्य दान द्यावे. कुपात्रास दान करु नये.

४८) भुख्याने अन्न आपवूं सही, तरसाने तो पावूं पाणी.

जो भुकेलेला असेल त्याला अन्नाची आवश्यकता असल्याने त्यास अन्नदानच करावे जो तृषार्थ असेल त्याला पाण्याची आवश्यकता असल्याने त्यास पाणी देवून तृप्त करावे.

४९) नागाने वस्त्र आपीने अरथज लेवूं.

जो नग्न असेल ज्याच्या शरिरावर कपडा नसेल त्यास कपड्याची आवश्यकता असल्याने कपडा द्यावा. अन्नसत्र, धर्मदाय दवाखाने शैक्षणिक संस्था इ. बाबतीत पैशांची आवश्यकता असणाऱ्या व्यक्तीस तो जर योग्य सन्मार्गाच्या कामाकरीता खर्च करीत असेल तर योग्यायोग्य विचार करुन दान करावे. अशारितीने पात्र पाहून दान करावे व आपले सार्थक करुन घ्यावे.

५०) सगा सागवाने ग्रासज सहेऊ.

रागा, सोयरा, इष्ट-मित्र, स्नेही संबंधी वगैरे असतील त्यांची यथायोग्य बडदास्त ठेवावी. त्यांची यथायेग्य सेवा करावी.

५१) सेवा अभ्यागतनी करवी सही.

जे अभ्यागत, पाहुणे अतिथी असतील त्यांची आसन, भोजन, मान सन्मान इत्यादिके करुन चांगल्याप्रकारे सेवा चाकरी करावी. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, गुरुदेवो भव, अतिथी देवो भव' असे शास्त्रवचन प्रसिध्दच आहे म्हणून त्यांची देव समजून सेवा चाकरी करावी.

५२) परस्त्री गमन करवूं नही.

परस्त्रीगमन अथवा परपुरुष चिंतन करु नये. आरोग्यदृष्ट्या ते हानिकारक व नैतिकदृष्ट्या ते अत्यंत अधोगतीचे पापकर्म आहे.

५३) भुंडी नजरे जोवूं नही.

कोणाकडेही वाईट नजरेने, विषयी विकारी कामूक दृष्टीने पाहू नये.

कोणाचीही हेटाळणी, टवाळकी करु नये. कोणाकडेही पाहण्याचा आपला दृष्टीकोन शुध्द, पवित्र असावा.

५४) स्त्री आगळ गुंज न करवी.

परस्त्री सोबत अगर आपल्या स्वस्त्रीजवळसुद्धां गुज गोष्टी करु नये. अतिशय विषयीभोगी, विलासी स्त्रीलंपट बनू नये. मनुष्याने आपल्या स्वतःच्या तरुण आई, बहिण, मुलगी अथवा अन्य कोणत्याही स्त्रीसोबत एकांतवासात बसू नये अथवा बोलू नये असे शास्त्रवचन आहे. कारण इन्द्रियांची विषयाकडची धाव ही अनिवार्य असते त्यायोगे मनुष्यावर अनेक संकटे येतात व त्याची नैतिक हानी होते.

५५) झुठी जाणी अजाणी गवाई न दिंजे.

जाणून-बुजून माहित असून अगर माहित नसूनसुध्दां खोटी साक्ष देऊ नये. क्षणिक लोभाकरीता मनुष्याने आपला ईमान बदलवून बेईमान बनू नये.

५६) झुठो खत न लखवी सती.

कोणीही कोणाला खोटे कार्ड लिहून पाठवून फसवू नये. त्याचप्रमाणे कोणाकडूनही खोटे दस्तऐवज, गहाण खत, करारपत्र, प्रॉमेसरी नोट, बक्षिसपत्र, हवालनामा वगैरे कागदपत्र लिखाण खोटे लिहून घेऊन फसवू नये, कारण ते विश्वासघाताहूनही अधिक पापकर्म आहे.

५७) लालच न खाइये एक रती.

कोणतेही काम करतांना लाचलुचपत घेऊ नये. निर्लोभीपणाने काम करण्याचा मनास धडा शिकवावा. लाचलुचपत घेऊन मिळविलेली संपत्ती विपरीत बुद्धि उत्पन्न करणारी असते. त्यायोगे मनुष्यास निरनिराळ्या प्रकारची दुर्व्यसने लागून अधःपतन होते.

५८) जहर खाई झपलाइ मरवूं नही, अवागमन सही अवतरवूं.

कोणीही जहर खाऊन, विष घेऊन अगर नदी, तलाव विहीर यात किंवा कड्यावरून उडी टाकून आत्महत्या करु नये. तसे केल्यास जिवात्म्यास सद्गती मुळीच लाभत नाही. त्याचे क्रीयमाण अपूर्ण राहिल्याने उलट त्यांस वारंवार जन्मरणाचे फेरे खावे लागतात.

५९) अग्नी उपर जुठू पाणी छाटवूं नही.

अग्नीवर उष्टे, खरकटे, घाण पाणी टाकू नये कारण अग्नी ही देवता आहे. यज्ञयाग. होमादि धार्मिक विधीत अग्नी हा नारायण स्वरुप कल्पून त्याची पूजा केली जाते, त्यावर घाण पाणी टाकून त्याचा अपमान करु नये.

६०) निलू झाड उखाडवू नही.

हिरवे ओले झाड विनाकारण उपटू नये किंवा तोडू नये. त्यांतसुद्धा जीव चैतन्याचा वास असतो.

६१) प्रभाते फळ फूल चुटिया बहु छे पाप.

सकाळच्या प्रहरी म्हणजे सूर्यनारायण उगवत असण्याच्या संधी कालांत फळे फुले तोडणे महान् पापमूलक आहे.

६२) अवाचक प्राणीने आळ न करवी.

अवाचक प्राण्यावर सदैव दया करावी. पशुपक्षी आदि अवाचक जीवप्राणिमात्रावर कोणत्याही प्रकारचा आळ घेऊ नये.

६३) हाड विकरो करे पातक सही.

हाडविक्रय म्हणजे पशुपक्षी आदि विकणे हे महान पातक आहे. गाय, बैल, म्हैस आदि पशुंचे चांगल्याप्रकारे पालन करणे महान पुण्यप्रद आहे.

६४) पशु पोषीने वेचवूं नही.

पशुंचे म्हणजे गाय, बैल, म्हैस, घोडा आदि पशुंचे भरण पोषण चांगल्याप्रकारे करुन शेवटी केवळ आपल्या स्वार्थाकरीता विकू नये. ते पापकर्म आहे. विकावयाचे असल्यास कोणी त्या पशुंचे पालन करण्यास समर्थ असेल त्यासच ते द्यावेत. त्यांची भरण पोषणाची गैरसोय झाल्यास ज्याने विकले त्यासही त्या पातकाचा अधिकारी व्हावे लागते.

६५) धरतीनो मोल न करशो अे छे माता.

जमीनीचे मोल करुन ती विकू नये कारण ती आपले भरण पोषण करणारी अन्नदात्री माता आहे. कर्जाकरिता अगर अन्य सुखचैनीच्या उपभोगाच्या खर्चाकरीता जमिनीचा विक्रय करु नये. तिची उत्तमप्रकारे मशागत करून त्यावर आपला उदरनिर्वाह चालवावा. जास्त लोभत पडू नये. जमिनीच्या बळावर मनुष्य अनेक लोकांचे, पशुपक्षांचे भरण पोषण करु शकतो. ते सर्व श्रेय त्यास प्राप्त होते. शिवाय धर्म कार्य दान आदि अनेकानेक सत्कृत्यें करण्यास जमीन हे उत्तमप्रकारचे साधन परमेश्वराने मनुष्यास दिलेले आहे. त्याचा ईश्वर कार्याकरिताच मनुष्याने उपयोग केल्यास त्यास श्रेयाची प्राप्ति होईल.

६६) कन्या तणो द्रव्य रखे न खाशो

आपल्या मुलीने आपल्याकडेस ठेवलेले द्रव्य आपल्या स्वतःच्या घरखर्चासाठी उपभोगू नये. कन्यादानाचे वेळी अगर यथाकाली ते संपूर्ण योग्यप्रकारे परत करावे.

६७) झुठु रखेश्वर बोलवूं नही.

हे ऋषिवर्या। असत्य आणि कठोर वचन कधीही बोलू नये. मनुष्याने बोलतांना सदैव सत्य व मृदु वाणीचा अवलंब करावा. काया, वाचा मनाने प्राणिमात्रांचे यथार्थ कल्याण होईल अशाच रितीने बोलावे.

६८) मुखथी मार न कहेवूं लगार.

आपल्या मुखांतून कोणासही 'मार' असे देखील शब्द काढू नये. आपल्या मार म्हणण्याने एखाद्याने मारल्यास अगर जीव हिंसा केल्यास ते सर्व पातक मार म्हणणारावर येते. म्हणून कोणाचेही मन आपल्या काया वाचा मने करुन दुखवू नये.

६९) धन व्याजनी न लेवो आहार.

एखादा सावकार अथवा धनको ऋणकोस कर्ज देऊन त्या धनावर भरपूर चोपून अन्यायाने व्याज घेत असेल अगर सवाई दीढी वगैरे वसूल करीत असेल, थोडक्यात म्हणजे आसुरी संपदेच्या योगाने धन गोळा करीत असेल तर त्याच्या घरी अन्नसुद्धां सेवन करु नये. कारण 'जसा आहार तसा ढेकर,' असे ज्याच्या घरचे अन्न तशी त्याची घडण आपल्याही मनावर बुद्धिवर होते म्हणून त्याचे घरचे अन्न सेवन करु नये.

७०) मेली थापण न राखवी जाणी.

कोणाचीही रकम ठेव हडप करु नये. गहाण फरोक्त कर्ज वगैरे खोटे दस्तऐवज करुन घेऊन लुबाडू नये. ज्याची रकम असेल त्यास परत करावी. विश्वासघाताने अगर अन्य बेईमानीपणा करुन बळकावून बसू नये. तशा अन्यायाने जमविलेली आसुरी संपत्ति त्या मनुष्यास सौख्य शांती देऊ शकत नाही. ती आसुरी संपत्ती त्याच्या दैवी संपत्तिसह त्याचा पूर्णपणे विनाश केल्याशिवाय राहात नाही.

७१) विश्वास घात केना करवूं नही.

कोणाचाही कोणत्याही बाबतीत विश्वासघात करु नये. कारण ते महत् पातक आहे. विश्वासघातासारखे अन्य महान पाप नाही.

७२) पडी जडी वस्तू केनी लेवी नही.

कोणाचीही रस्त्यात पडलेली जरी वस्तू असली तरी ती आपली आहे

असे म्हणून उचलू नये. तसेच कोणाचीही वस्तू चोरीने अन्यायाने बळजबरीने उचलून घेऊन ही आमचीच आहे असे सांगून तिचा उपभोग घेऊ नये. तसे केल्यास आपण त्यांच्या ऋणात बांधले जातो. ते ऋण परत फेड केल्याशिवाय फिटू शकत नाही.

७३) उधार उसणू न राखवी प्राणी.

कोणाजवळून उधार उसनवार आणलेली रक्कम अगर वस्तू परत केल्याशिवाय राहू नये. ती परत न केल्यास अगर परत करण्याचे विसरल्यास त्यांच्या ऋणानुबंधनात आपण बांधले जातो व हरप्रकारे तो ऋणानुबंध पूर्ण करावा लागतो.

७४) पारकू धन लइने भोगवू नही;।
पुत्र थइने ते धन आपवूं पडशे सही.

दुसऱ्याचे धन अन्यायाने हडप करु नये. व त्याचा उपयभोग घेऊ नये. कारण ऋणानुबंधाच्या नियमाने पुढच्या जन्मी तेच धन पुत्ररुपाने अगर अन्यरुपाने परत करावे लागते. त्या ऋणातून मुक्त व्हावे लागते.

७५) जुवा जुगटा न रमीये साथ.

जुवा, फासें, सोंगट्या, सट्टा, पत्ता, जुगार, रेसिस् आदि मनाला भावणारे परंतु परिणामी पश्चात्ताप करावयास लावणारे जुलमी व जुजबी खेळ खेळून अधोगति-सर्वस्वनाश करुन घेऊ नये.

७६) नाच छंद न जोईये भाई.

नाच, छंद, तमाशा, सिनेमा आदि मनाला आवडणारे डोळ्यास चांगले दिसणारे व कानांना चांगले ऐकविणारे परंतु परिणामी मनुष्यास अधोगतिच्या खाईत लोटणारे नाद छंद पाहू नये ऐकू नये. त्यायोगे मनुष्याचे आर्थिक व मानसिक नुकसान होते.

७७) अे छळ भेद सतगुरुथी खोवा सही.

या नाच छंदांच्या छल भेदाने मनुष्य सद्गुरु वचनापासून परावृत्त होतो व संसाराच्या मिथ्या मोहमायेच्या महान गर्तेत बुडून जातो व जेथून तो कधीच वर येऊ शकत नाही अशा घोर नरकाप्रत जातो.

७८) संसार करे ते तव न करवूं.

जग म्हणजे बहुसंख्य लोक सुखचैन-मौजमजा करतात म्हणून आपणही ती मजा लुटू असे म्हणून फसूं नये. आता लोभस वाटणारी ती मजा परिणामी विष आहे. कारण दुनियेच्या असत् संगतीत जे जीव परमेश्वराला विसरतात ते सतत दुनियेच्या फेऱ्यात फिरत असतात.

७९) कुड कपटनी मेलो घात.

आपल्या मनातून अन्य जनांविषयी असलेले कुडकपट विश्वासघात सर्वस्वी काढून टाका.

८०) दया राखवी दिलसु जाणी.

आपल्या हृदयात संपूर्ण भूतप्राणिमात्राविषयी सदैव प्रेमभाव व दयाभाव जागृत ठेवावा. कोणाही प्राण्यास तनाने, मनाने व वाचेने आपल्याकडून उपसर्ग पोहोचणार नाही ही बुद्धि आपल्या हृदयात सतत जागृत ठेवा.

८१) पवित्र दिले रहेवुं निरधार.

सदैव आपले हृदय निर्मऊ शुध्द विचारांनी व वागणुकीनी पवित्र ठेवावे. ते मलीन होऊ देऊ नये.

८२) शत्रु करे ते न करवू.

आपला शत्रु तसे करतो आहे म्हणून आपणही तसेच करावे अशी ईर्षा मनात बाळगू नये. व्यवहार कर्मात आपणाकडून प्रमाद होऊ नये. दैवयोगाने एखादा शत्रु निर्माण झाल्यास त्यापासून सावध राहणे हे आपले कर्तव्य

आहे. अध्यात्मिक उन्नतिच्या मार्गात मात्र अन्य कोणीही आपला शत्रु नाही. आपले मनच आपले शत्रु आहे त्यास चांगल्याप्रकारे वश करावे.

८३) परदुःख जाणीने पाछे रहूं.

दुसऱ्यास होणारे दुःख जाणून त्या दुःखाचा परिहार करण्याचा आपण आपापल्यापरी प्रयत्न करावा. त्या दुःखात तेल ओतून अधिक भडका उडवू नये. परदुःख सहिष्णू असावे.

८४) मोठाईमा गर्व न करवूं.

आपणास प्राप्त झालेल्या मोठाईचा-मान मरातब बढाईचा गर्व करु नये. इतरेजनांत शेखी मिरवू नये. कारण तो मान अथवा गर्व टिकाऊ नसतो. जगताच्या परिवर्तनशील कालचक्राने त्याचा ऱ्हास नाश होतो. म्हणून प्राप्त परिस्थितीत अन्य लोकांची परोपकार बुद्धिने सेवा करुन सुकीर्ती संपादन करावी.

८५) सते चालो तमे दिवसने रात.

रात्रंदिवस सत्यतेने सचोटीने वागावयास हवे आहे. ज्यायोगे आपणाकडून दुसऱ्यास संसर्ग त्रास पोहोचणार नाही. अशाप्रकारे कायेने, वाचेने व मनाने सत्यतेने वागावे.

८६) लोभ न करवो रखे लगार.

एका कवडीचाही लोभ करु नये. आपल्या जीवीत कर्मास आवश्यक तेवढ्या वस्तूंचे उपार्जन नीतिमार्गाने करावे. जास्त लोभात पडू नये. कारण अतिलोभ हा वासनामूलक आणि विनाशकारक असतो.

८७) काम क्रोध तजवोरे भाई.

आपल्या अंगी मुरलेले काम, क्रोध, लोभ आदि दुष्ट शत्रूंचा आपण ताबडतोब त्याग करावा. त्यांच्या शिवाय त्रिभुवनांत आपला शत्रु कोणीही

नाही. त्यांना मनाची साथ मिळाल्यास ते आपला घात करतात.

८८) तप तीरथ करवुं स्नान.

प्रत्येक मनुष्याने ध्यान, धारणा, समाधी, तपश्चर्या इ. चे शास्त्रशुध्द नियमानुसार अनुष्ठान करावे. तीर्थस्नान अथवा तीर्थयात्रा अवश्य कराव्यात. ईश्वर साधनेस आवश्यक अशा मानसिक पावित्र्यकरिता तीर्थयात्रेचे महत्व सांगितले जाते म्हणून तीर्थयात्रा करतांना मन शुद्ध व पवित्र ठेवा.

८९) उपवास व्रतनी आस न धरवी.

व्रतोपवासांची फलाकांक्षा फलप्राप्तीची इच्छा मनात धरु नये. निरीच्छ बुध्दीने निष्कामबुद्धीने कोणतेही कर्म करावे. फलाच्या इच्छेनेच ही कर्मे केल्यास फलप्राप्ती तर होईलच. पण निष्कामतेने ही कर्मे केल्यास त्याचा प्रभाव सहेतूक कर्मापेक्षा अधिक श्रेष्ठ प्रकारचा असतो.

९०) पाषाणनी पूजा करवी नही आत्मापूजा करवी सही.

देव म्हणून दगडाची पूजा करु नका. कारण मूर्तीत ज्या ईश्वराचे अस्तित्व कल्पावे लागते तेच ईश्वरत्व प्रत्यक प्राणिमात्राचे हृदयात चैतन्यररुपाने असते. म्हणून मूर्तिपूजेपेक्षा आत्म्याची जीवप्राणिमात्रांची-त्यांच्याशी चांगल्यारीतीने वागून पूजा करणे सर्वश्रेष्ठ आहे. जडवस्तूंच्या पूजेपेक्षा चैतन्यशक्तिच्या उपासनेस अधिक महत्व आहे. मूर्तिपूजा ही धार्मिक भावनांची पहिली पायरी आहे. मानसिक पूजा ही दुसरी पायरी आहे व आत्मौपम्य बुद्धि ही शेवटची पायरी आहे. मनुष्याने पायरी पायरीने आपली अध्यात्मिक उन्नति करावी. एकाच पायरीवर अडकून राहू नये.

९१) अमरथाये तो जपीये जाप. योगाभ्यास नीत करवूं सही.

अमर होण्याकरीता गुरुमंत्राचा सतत जाप करावा व त्याकरीता नियमीत योगाभ्यास प्राणायाम, ध्यान धारणा वगैरेचा अभ्यास करावा. आत्मिक उन्नतिकरिता योगाभ्यासाची आत्यंतीक आवश्यकता आहे.

९२) खट दर्शन पूजे नही पामे मोक्ष.

असत् दर्शनाच्या म्हणजे निकृष्ट देवतांच्या उपासनांच्या जाळ्यात अडकून स्वतःला फसवू नका. या मतमतांतराच्या जाळ्यात फसल्यास मोक्षसाधना तर बाजूसच ! परंतु लक्षचौऱ्यांशीचेच फेरे खावे लागतील. सत्-दर्शनाप्रमाणे म्हणजे सन्मार्गाच्या नियमाप्रमाणे वागल्यास मोक्षसाधना सुलभ होईल.

९३) वेदशास्त्र कहे तू करवूरे भाई.

वेदश्रुति, स्मृति, वेदांत उपनिषदे आदि सत्ग्रंथ जे काही तत्व नीतिनियम सांगत आहेत. त्याप्रमाणे आचरण करावे. असत् ग्रंथ अथवा भौतिक सुखचैनीच्या गोष्टींनी भरलेल्या ग्रंथाचे वाचन केल्यास मन अधिकाधिक चंचल बनून ईश्वर भजनापासून व तत्वचिंतनापासून दुरावते.

९४) चतुराई चोखाई रहेवुरे भाई.

मनुष्याने सदैव कोणत्याही व्यवहार धर्मात चतुराईन चौकस बुद्धिने वागून आत्मोन्नति करुन घ्यावी. पण चौपट, मूर्ख, दीर्घ किंवा अतिशहाणा मात्र बनू नये. त्यायोगे मनुष्याची अधोगती होते.

९५) मूरखपणमा न रहेवुरे प्राणि.

मूर्खपणात राहून अंधश्रद्धा ठेवून अगर अश्रद्धा बाळगून स्वतःस फसवू नये. मूर्खपणाचा त्याग करून आत्मश्रध्देचा अवलंब करावा. अज्ञानपणात राहू नये.

९६) ज्ञानदृष्टे जोवू सही सरखू.

ज्ञानदृष्टीने पाहून, सद्सद्विवेक बुध्दीने जाणून नित्या-नित्य वस्तूविवेकाचा अवलंब करुन म्हणजे नित्य वस्तू काय व अनित्य वस्तू कोणत्या याचा सारासार विचार करून अनित्य वस्तुचा त्याग व नित्यवस्तुंचा संग्रह अवलंब करुन आत्मोन्नति करावी. सर्व प्राणिमात्राचे ठायी एकमेव परब्रह्म परमेश्वराचे

चैतन्यरुपाने अस्तित्व असल्याने सर्वांशी आत्मरुप समानपणाने वागावे. द्वैत भाव करु नये.

९७) साचु झुट्ना न करशो वाद.

'माझे मत खरे, दुसऱ्याचे खोटे अशाप्रकारचा खऱ्या खोट्याचा व्यर्थ वादविवाद करीत बसू नये. खोट्याचा त्याग करुन खऱ्या शास्त्रसंमत मताचा अवलंब करावा.

९८) गुरुनु वचन लोपवुं नही.

गुरुचे वचन लोपवू नये. गुरुवचनाच्या मर्यादेच उल्लंघन करु नये. सद्गुरुंनी कथन केलेले ज्ञान ऐकून व्यर्थ सोडून देऊ नये. यथाशक्ति त्याचे आचरण करावे व यथामति त्याचा प्रसार प्रचार करावा. आत्मोन्नतिकरिता सद्शास्त्रांनी व सद्गुरुंनी कथन केलेले ज्ञान संकुचितपणाने स्वतः जवळच लपवून ठेवू नये. दुसऱ्यांना त्याचा उपदेश करावा. ज्ञानप्रसार करणे महान पुण्यप्रद आहे.

९९) शिखामण पुछे तेणे सारी दिजे.

जो मनुष्य सत्यधर्माची सन्मार्गाची शिकवण विचारील, ज्याला त्या ज्ञानाची आवश्यकता असेल उत्कंठा, जिज्ञासा, तळमळ असेल, जीवनांत कसे वागावे याविषयी जाणून घेण्याची आकांक्षा असेल, त्यास यथाबुद्धि योग्य शिकवण द्यावी. सन्मार्गदर्शन करावे. अयोग्य वा अधर्म मूलक शिकवण देऊन कोणालाही फसवू नये.

१००) सांजे सुमरणी लई हरिस्मरण कीजे.

सायंसंध्येच्या वेळी किंवा प्रातरसंध्येच्या वेळी अथवा पूजेच्यावेळी हातात जपमाळ घेऊन परमेश्वर स्मरण सद्गुरु चिंतन, ध्यान धारणा, सायंसंध्या अवश्य करा.

उपसंहार

पीवो अमीरस ब्रह्माजी मळीया । पाळो ऋषिवर सो ये क्रिया ।। १ ।।

अहो ऋषिवर्यांनो ! या वर कथन केलेल्या शंभर क्रियांचे निर्धाराने पालन करा. निश्चयाने त्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न करा. सद्गुरु ब्रह्मदेवाच्या हातात असलेल्या अमृत कलशांतील ते साक्षात् अमृतच आहे.

आ सतधर्म लईने ओरावो जाई । सो क्रियानी तमे पहेरावो जनोई ।। २ ।।

अशाप्रकारच्या या सध्दर्माचा स्विकार करुन दिक्षा ग्रहण करुन वारंवार त्याच्या तत्वांचे परिशिलन करा. श्रवण मनन करा. आणि या वर कथन केलेल्या शंभर क्रियाचरणांचे जानवे करुन गळ्यात धारण करुन खऱ्या अर्थाने ब्राह्मण व्हा. परब्रह्माची ओळख करुन घ्या.

थया ब्राह्मण ब्रह्माजी मलीया । तेना आवागमनना फेरा टळीया ।। ३ ।।

ब्राह्मण कोणास म्हणावे ! ब्रह्म जाणेल तो ब्राह्मण. केवळ सुताचे तीन दोरे गळ्यात घातल्याने ब्राह्मण होणार नाही. तर ह्या शंभर नियमांचे जानवे गळ्यात घातले म्हणजे पूर्णपणे या नियमाचे पालन केले तो खरा ब्राह्मण. वेदविद् सत्पुरुष होय. त्यालाच खरोखर ब्रह्मत्वाची प्राप्ति झाली असे समजावे. म्हणजे अशा मनुष्यास सद्गुरु ब्रह्माचा साक्षात्कार होतो आणि त्याचा आवागमनाचा लक्षचौर्यांयशी जीवयोनीचा फेरा मिटतो.

ऋषीवर सांभलो ब्रह्मगिनान । नीत गतमा जई करो गंगास्नान ।। ४ ।।

अहो श्रेष्ठ ऋषिवर्यांनो ! खरोखर तुम्ही हे ब्रह्म जाणण्याचे ज्ञान-ब्रह्मज्ञान श्रवण करा व नेहमी नियमीतपणे गतगंगारुपी पवित्र तीर्थस्थानांत शुध्द निर्मळ स्नान करा. तत्वज्ञानाच्या योगाने आपल्याठायी जडलेला अशुध्दतेचा मळ धुवून टाकून शुध्द व पवित्र व्हा.

आवा ब्रह्मज्ञान सतगुरुने भावे । अडसठ तीरथ गुरुने चरणे आवे।। ५ ।।

हे ब्रह्मज्ञान सद्‌गुरु महाराजांनी आपणाकरीता कथन केलेले आहे. त्यायोगे आपणास परमगुरु परमेश्वराचा म्हणजे पर्यायाने सद्‌गुरु महाराजांचाच साक्षात्कार करुन घ्यावयाचा आहे. म्हणून या तत्वज्ञानाच्या योगाने सद्‌गुरु महाराजांची कृपादृष्टी आपणाकडे आकर्षित करुन घ्या. महान पवित्र अशा अडसष्ट अथवा अष्टशत तीर्थाचा महिमा सद्‌गुरु महाराजांच्या चरणी असतो. म्हणून त्यांच्या चरणामृत तीर्थाचे पान करावयास हवे.

प्रत्यक्ष गुरु नर गतमा बैठा। भाग्य जेना सद्‌गुरु ज्ञाने दिठा।।६।।

सद्‌गुरु महाराजांचे खरे वास्तव्य गतगंगेत म्हणजे जेथे त्याच्या नावाने पूजा अर्चा, मंत्रोपचार ध्यान धारणादि विधी होत असतो, तेथे प्रकर्षाने असते. परंतु ज्याचे नशिब बलवत्तर असते, ज्याचा भाग्यरवि उदयास येतो अशा महान भाग्यवान मनुष्यालाच त्याची जाणीव अथवा ज्ञानसंवेगाने त्यांची प्रत्यक्ष दर्शन भेट होत असते.

ज्ञान ध्यानमां जुवो विचारी । दुनियामाहे देव गुप्त अवतारी ।। ७ ।।

दुनियात म्हणजे जगतात ते गुप्तरितीने कोठेना कोठेतरी कोणत्याही रुपाने अवतीर्ण होत असतातच, नव्हे ते सर्वत्र गुप्तरीतीने व्यापलेले आहेत. जे ज्ञान ध्यान व सद्‌सद्विवेक बुध्दिने त्यांना जाणतात, त्यांनाच त्यांची साक्षात्कार रुपाने ओळख होत असते. गुह्य गोष्टींचा साक्षात्कार गुह्यज्ञान प्राप्तिशिवाय होऊ शकणार नाही. म्हणून ते प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करा.

ऋषिवर ते जे राखे ज्ञान । निर्मल थईने धरवुं ध्यान ।। ८ ।।

खरा ऋषिवर तोच समजावा, ज्याला खरे ज्ञान म्हणजे 'एकंसत्, तत्व जाणण्याचे ज्ञान प्राप्त झालेले आहे. ज्याला हे ज्ञान प्राप्त झाले असेल तोच निर्मळ होऊन ध्यान करण्यास सिध्द होऊ शकेल. शारिरीक बाह्यशुद्धिशिवाय आंतरीक अथवा मानसिक निर्मलता होऊ शकत नाही. अंतर्बाह्य निर्मळ झाल्याशिवाय निर्मल ध्यान सिद्ध होऊ शकत नाही. याकरीता सदैव निर्मळ

राहण्याचा प्रयत्न करा.


मुनिवर ते जे वारे छे मन । गुरुवचन कसोटीमा कसे काया रतन ॥ ९ ॥

खरे मुनिवर तेच समजावेत जे आपले चंचल मन सर्व विषयातून काढून एकमेव परब्रह्म परमेश्वराच्या सर्वश्रेष्ठ सत्यस्वरुपावर स्थिर करतील आणि जे गुरुवचन पालनाच्या कसोटीतून आपले कायारुप रत्न पारखून घेतील. म्हणजे हृदयस्थ नारायणाचा साक्षात्कार करवून घेतील तेच खरे मुनिवर जाणावेत असे मुनिवरच नीतितत्वांचे अवलंबन करु शकतात.

कहेत इमामशाह सुणो गत सोही । सो क्रियानी तमे पहेरो जनोई ॥ १० ॥

सद्गुरु इमामशाह महाराज सांगत आहेत की, अहो सत्संगरुप गतगंगेच्या महान पवित्र तीर्थक्षेत्रात स्नान करणाऱ्या महान ऋषिमुनि जनगणहो; तुम्ही वर वर्णिलेली शंभर क्रियांची विचार मालिका आपल्या अंगी बाणविण्याचा, धारण करण्याचा सतत निर्धाराने प्रयत्न करा व खऱ्या अर्थाने ब्रह्म जाणून परमोच्च वैदिक ब्राह्मणस्वरुप होऊन परब्रह्म परमेश्वराच्या सत्यस्वरुपाच्या दर्शनाचे अधिकारी व्हा.

ॐ शान्तिः ! शान्तिः !! शान्तिः !!!



प्रेरणापिठाधिश्वर सत्पंथाचार्य जगद्गुरु
श्री नानकदासजी महाराज



आचार्य श्री जनार्दन महाराज



आचार्य श्री पूर्णानंद महाराज

सत्पंथ मंदीर संस्थान, संतकृपा आश्रम,
फैजपूर, ता. यावल, जि. जळगांव (फो. ०२५८५-२४५४१७)



श्री. प्रेमराज विष्णू महाजन, सौ. मालती प्रेमराज महाजन, रोझोदे
श्री. शरद प्रेमराज महाजन, सौ. सुषमा शरद महाज , ह.मु. डोंबिवली
चि. राहूल शरद महाजन, चि. मोहित शरद महाजन यांचेकडून आर्थिक सहाय्य रु. १३,०००/-